गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे | अंक १३ वा | गुरुवार ३० मे २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 13 | Date : 30/05/2024 blow Thursday Page 4 Price 4

# येत्या ४८ तासांत आचारसंहिता शिथील होण्याची शक्यता..

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज** : येत्या ४८ तासांत राज्यातील आचार संहिता शिथिल होण्याची दाट शक्यता आहे. राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. धरणांनी तळ गाठल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. याचसोबत काही भागांत अवकाळी पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. राज्यात आचार संहिता असल्यानं सरकारी पातळीवर मोठे निर्णय घेता येत नाहीत, तसेच मंत्र्यांना पाहणी दौरेही करता येत नाहीत. याच पार्श्र्वभूमीवर राज्य सरकारनं निवडणूक आयोगाकडे आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी केलेली. दरम्यान, निवडणूक आयोगानं राज्य सरकारच्या निर्णयाचा गांभीर्यानं विचार केला असून येत्या ४८ तासांत आचार संहिता शिथील केली जाण्याची शक्यता आहे.

येत्या ४८ तासांत राज्यातील आचार संहिता उठवण्याबाबत मोठा निर्णय होऊ शकतो, अशी माहिती महायुतीतील एका

## राज्यातल्या तीव्र दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोग मोठा निर्णय घेणार?

ज्येष्ठ मंत्र्यानं एबीपी माझाला दिली आहे. महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघातील मतदानाची प्रक्रिया आता



पूर्ण झाली आहे. त्यामुळे राज्यात दुष्काळी उपाययोजनांसाठी आचारसंहिता शिथिल करण्यात यावी, अशी मागणी राज्य सरकारनं नुकतीच निवडणूक आयोगाकडे केली होती. राज्य सरकारच्या या मागणीचा येत्या ४८ तासांत विचार होऊन राज्यातील आचार संहिता उठवण्याचा मोठा निर्णय आयोग घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

देशभरातील लोकसभेचे सर्व टप्पे पार पडल्यानंतर ४ जूनला देशात लोकसभा निवडणुकांची मतमोजणी पार पडणार आहे. त्यामुळे देशभरात निवडणूक आयोगाकडून आचरसंहिता लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकांचे सर्व टप्पे पार पडले आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारनं निवडणूक आयोगाकडे निवडणूक संहितेत शिथिलता देण्याची मागणी केली आहे. पीडित आणि सरकारी सुविधांसाठी झगडणाऱ्या लोकांना मदत करता यावी, यासाठी मुख्य सचिवांनी पत्राद्वारे निवडणूक आयोगाचं लक्ष वेधलं आहे.

देशातील अनेक भागांत मान्सूनपूर्व पावसानं धुमाकूळ । पान २ वर

# यंदा भारतात मान्सून दमदार बरसणार

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुढील दोन दिवसानंतर म्हणजेच गुरुवारपासून देशांतील उष्णतेपासून दिलासा मिळणार आहे. दरम्यान, केरळमध्ये मान्सूनसाठी पोषक स्थिती निर्माण होत असून, लवकरच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. यंदा भारतात मान्सून दमदार बरसणार आहे. भारतातील काही भागांत मान्सून सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता देखील भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. या संदर्भातील माहिती पुणे हवामान विभागाचे प्रमुख डॉ. एस. होसाळीकर यांनी दिली. भारतातील मध्य भारत व दक्षिण भारतात पावसाची स्थिती सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता (सरासरीच्या १०६ टक्के) आहे. यामध्ये कमी जास्त ४ टक्के पाऊस होऊ शकतो. वायव्य भारतात सामान्य (सरासरीच्या ९२-१०८ टक्के), ईशान्य भारतात सामान्यपेक्षा कमी (सरासरीच्या ९४ टक्के) तर मान्सून कोर झोनमध्ये देखील (चउन) सामान्यपेक्षा जास्त



(सरासरीच्या १०६ टक्के) पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. मान्सूनचे वारे सध्या दक्षिण अरबी समुद्र आणि मालदीवमध्ये पोहोचले आहेत. अरबी समुद्र आणि हिंदी महासागरात मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदा मान्सूनची भारताच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू असून अशा परिस्थितीत मान्सून केरळमध्ये वेळेपूर्वीच ३१ मेपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. मान्सून लक्षद्वीपमार्गे दक्षिण अरबी समुद्र आणि मालदीवमार्गे केरळमध्ये दाखल होईल, अशी माहिती भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) दिली आहे.

आयएमडीने एक प्रसिद्धीपत्रक जारी करून मान्सूनची माहिती दिली आहे. त्यानुसार ३१ मेपर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होऊ शकतो. पुढे सरकताना मान्सून ईशान्य भारतातील राज्यांमध्येही अवघ्या ३-४ दिवसांत पोहोचेल. यासोबतच मेघालय आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पावसाची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे. याशिवाय आसाम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, केरळ येथे मुसळधार पाऊस पडणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात १०-११ जून दरम्यान मान्सून दाखल होईल. एकीकडे देशात कडक उन्हाचा तडाखा बसत असताना, दुसरीकडे मान्सूनही जोरदार बरसणार आहे. आयएमडीच्या म्हणण्यानुसार, यावेळी सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. पॅसिफिक महासागरातील ला निनामुळे मान्सून मजबूत झाला आहे. त्यामुळेच यंदा मान्सून भारताच्या दिशेने वेगाने सरकत आहे. साधारणपणे १ जून रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचतो. मात्र यावेळी मान्सून एक दिवस आधीच केरळमध्ये दाखल होणार आहे. ईशान्य भारत व्यापल्यानंतर मान्सूनचे वारे उत्तर भारत आणि मध्य भारताकडे सरकतील. अशा परिस्थितीत जूनच्या अखेरीस मान्सून संपूर्ण भारत व्यापून टाकील.

# चिखली तालुक्यात अनेक गावात अवैध देशी दारूच्या अनेक शाखा !

## दारूबंदी विभागाचे दुर्लक्ष,दारूमुळे अनेकांचे संसार उघड्यावर,तरुणाई व्यसनाधीन!

**बुलढाणा/ राहुल साबळे**

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात अनेक गावामध्ये अवैध प्रमाणे मिळत असलेल्या देशी दारूमुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडत असताना दारूबंदी विभागाचे अनेक दिवसांपासून दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.चिखली तालुक्यात अनेक गावांमध्ये अवैध देशी दारू विक्रेत्यांच्या जणूकाही स्पर्धा लागली आहे.प्रत्येक गावात पाच पाच सहा सहा अवैध देशी दारूचे दुकाने थाटून नऊ तरुणाई बिघडवण्याचे काम सध्या दिसून येत आहे.

एवढे असताना संबंधित विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होते का व त्यांचे अवैध दारू विक्रेता सोबत आर्थिक व्यवहार असा प्रश्न सर्वसामान्यांना पडलेला आहे.सध्या चिखली




तालुक्यात अवैध धंद्यांनी कळस घातला असून त्यामध्ये पान टपरी पासून किराणादुकान पर्यंत पेट्रोल विक्री असो,अवैध गुटखा असो व प्रत्येक गावात अवैध देशी दारूच्या अनेक दुकान थाटून त्यांनी शाखा उघडल्या असून सुद्धा संबंधित विभाग कोणतीही कारवाई करताना दिसून येत नाही.अवैध दारू विक्रीचे प्रकरण हे राजे उत्पादन शुल्क विभागाचे असून या प्रकरणात त्यांनी डोळ्यावर पट्टी बांधल्याचे अनेक प्रकरणात दिसून येत आहे.

**चिखली तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध देशी दारूची वाहतूक होत असतानाच अनेक गावांमध्ये चक्क पाच, सहा शाखा उघडण्यात आल्या असून त्यामध्ये सर्रास सकाळी सहा वाजेपासून दारू विक्री होत आहे तरी संबंधित विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे निर्देशनात येत आहे.मुबलक प्रमाणात मिळत असलेल्या अवैध देशी दारूमुळे तरुणाई व्यसनाधीन झाली आहे,तरी संबंधित विभागाने प्रत्येक गावामध्ये मिळणाऱ्या मुबलक अवैध देशी दारूचे दुकाने बंद करून व्यसनाधीन होत चाललेली तरुणाई कुठेतरी थांबावी अशी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पाऊले उचलावीहीच अपेक्षा. –दिलीप जाधव,ग्रामस्थ मेरा बुद्रुक**

चिखली तालुक्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील अनेक अधिकारी अवैध देशी दारू विक्रेत्याकडून अवैध देशी दारू विक्री करण्याचे पैसे वसूली करत असल्याचे सुद्धा अनेक गावांमध्ये ओरड होत आहे तरी तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांना दारूबंदी विभागावर विश्र्वास नसून पोलीस प्रशासन यावर काय ॲक्शन घेते याकडे तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकांचे लक्ष लागून आहे. एकीकडे मुबलक प्रमाणे मिळत असलेल्या अवैध देशी दारूमुळे तरुणाई व्यसनाधीन होऊन आणि अनेक तरुणांचे लग्न सुद्धा होत नसल्याचे समोर येत आहे,तसेच अनेकांचे संसार उघड्यावर पडत असताना प्रत्येक गावातील सामाजिक कार्यकर्ते यांनी चुप्पी साधली आहे.

# मनुस्मृतीला नवीन अभ्यासक्रमाद्वारे पुनर्जीवन देण्याचा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदचा डाव

## सम्यक विद्यार्थी आंदोलन हाणून पडणार



**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ मसुद्यात राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य, यांनी मनुस्मृतीचे समर्थन करणारा अभ्यासक्रम आराखडा नुकताच जाहीर केलेला आहे, त्याचा निषेध म्हणून ड.बाळासाहेब आंबेडकर, प्रा.अजंलीताई आंबेडकर व सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार मा.महेश भारतीय सर यांच्या आदेशानुसार सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या । पान २ वर

# मतमोजणी हा निवडणुकीचा शेवटचा टप्पा असल्याने सर्वांनी दक्षता घेऊन काम करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**✼ सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी सोलापूर शहरातील रामवाडी येथील शासकीय गोदामात मतमोजणी ४ जून रोजी होणार ✼ मतमोजणी केंद्रात निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक निरीक्षक यांनाच मोबाईल फोन घेऊन जाण्यास परवानगी ✼ निवडणूक आयोगाचे अधिकृत पासेस असलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना फक्त मीडिया सेंटर मध्येच मोबाईल फोन बाळगण्यास परवानगी**



**सोलापूर/प्रतिनिधी:**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ४२-सोलापूर(अ. जा.) व ४३-माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली होती. त्याच अनुषंगाने आयोगाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक ०४ जून २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया होणार आहे. मतमोजणी हा निवडणुकीचा शेवटचा टप्पा असल्याने यासाठी नियुक्त सर्व नोडल अधिकारी व मतमोजणी अधिकारी-कर्मचारी यांनी ही प्रक्रिया अत्यंत दक्षता घेऊन यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाचे मतमोजणीच्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी तथा माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, तसेच विविध समित्यांचे नोडल अधिकारी व मतमोजणी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, मतमोजणी हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. ज्याप्रमाणे मतदानाची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली त्याप्रमाणेच सर्व नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी मतमोजणीची ही प्रक्रिया अत्यंत दक्षता घेऊन पार पाडावी. मतमोजणीसाठी नियुक्त प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी मतमोजणी कक्षात प्रवेश करण्यासाठी पासेस बनवून घ्यावेत. विना पास कोणालाही मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. भारत निवडणूक आयोगाकडील अधिकृत पासेस असलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना माध्यम कक्षा पर्यंत प्रवेश दिला जाणार आहे. तसेच माध्यम कक्षा पर्यंत मोबाईल घेऊन जाणे व वापरणे यासाठी परवानगी असेल असेही त्यांनी सांगितले.

मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. मतमोजणीचे पर्यवेक्षण व नियंत्रण टीम, भोजन व्यवस्था, मतमोजणी कक्ष व परिसरातील स्वच्छता, मतमोजणी अधिकारी कर्मचाऱ्यांना जागेवर जेवण्याची व्यवस्था यासाठी नियुक्ती केलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश। पान २ वर

# संपादकीय

## कोरडी आश्वासने ..

सध्या बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. अशातच अनेक ठिकाणी पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले. मागील वर्षी पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे धरणं, तलावांमध्ये पाण्याचा साठा अल्पप्रमाणात राहिला आहे. तसेच उष्णतेत वाढ झाल्यामुळे विहिरी आणि बोअरवेलची पाणी पातळीदेखील खालावली आहे. काही ठिकाणी विहिरी आटल्या आहेत, तर बोअरवेल बंद पडले आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील बहुतांश भाग आता पाणीटंचाईचा सामना करत आहे. संभाजीनगरात यामुळे बांधकामांना बंदी घालण्यात आली आहे. अन्य भागातही पाणी वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये केवळ २४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दहा हजारांहून अधिक वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सरकार टँकरने पुरवठा करत आहे आणि तो करायलाच हवा, पण त्याचवेळी यामागे टँकर लॉबी आहे की काय याचाही विचार व्हावा. टँकरद्वारे दरवर्षी पाणी पुरवण्यापेक्षा पाण्याचे योग्य नियोजन आणि साठा केल्यास ही गरजच पडणार नाही. दुष्काळी गावांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, शेतीपंपाच्या बिलामध्ये सवलत, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर, शेतीपंपाची वीजजोडणी खंडित न करणे असे उपाय राबविले जाणे अपेक्षित आहे, पण निवडणुकीच्या धामधुमीत या प्रक्रियेला वेग आला नाही. दुष्काळापेक्षा निवडणुकांची गणिते महत्त्वाची वाटत असल्याने याबद्दल नाराजी असल्याचे स्पष्टपणे दिसते. दुसरीकडे पाणीटंचाईमुळे जनावरांच्या चाऱ्याचे दरदेखील वाढताना दिसत आहेत. कडबा, हिरवा चारा, सरकी पेंडीचे भावही वाढले आहेत. त्यामुळे जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न पशुपालकांना पडला आहे. शेतकऱ्यांच्या नावाने दुष्काळाचे फक्त राजकारण केले जाते. दुष्काळ हा राजकीय नेत्यांचा पर्यटन दौरा झाला आहे. राजकारण्यांच्या चिखलफेकीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या दूर होत नाहीत, त्यांना मदत करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ही जबाबदारी युती सरकारने झटकली आहे. शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी भाजपच्या काही नेत्यांनी निवडणूक काळात कोरडी आश्वासने दिली आहेत

# पायाभूत प्रकल्पातील भूसंपादनाच्या अडचणी संबंधित यंत्रणांनी १५ जून पर्यंत सोडवाव्यात : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

***जिल्हाधिकारी यांच्याकडून राष्ट्रीय महामार्ग, सुरत चेन्नई महामार्ग, कृष्णा मराठवाडा प्रकल्प, पालखी महामार्ग, सोलापूर उस्मानाबाद रेल्वे मार्ग, सोलापूर साठी प्रस्तावित असलेली समांतर पाईप लाईन,करमाळा टेंभुर्णी राष्ट्रीय महामार्ग, सोलापूर शहरातील उड्डाणपूल आदी पायाभूत प्रकल्पांच्या भूसंपादन विषयक अडीअडचणीचा सविस्तर आढावा घेऊन त्या सोडवण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिल्या.**



**सोलापूर/प्रतिनिधी :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध विकास कामे जिल्ह्याच्या विविध भागात सुरू आहेत. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, सुरत-चेन्नई महामार्ग, कृष्णा मराठवाडा प्रकल्प, पालखी महामार्ग, सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्ग,सोलापूरसाठी प्रस्तावित असलेली समांतर पाईप लाईन, नगर-करमाळा-टेंभुर्णी राष्ट्रीय महामार्ग आणि सोलापूर शहरातील उड्डाणपुलाची कामे या पायाभूत प्रकल्पांचा समावेश होतो. हे सर्व प्रकल्पाचे कामे विहित काल मर्यादित पूर्ण होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने या प्रकल्पाच्या कामात असलेल्या भूसंपादन विषयक अडचणी १५ जून पर्यंत सोडविण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नियोजन समिती सभागृहात आयोजित पायाभूत प्रकल्पातील भूसंपादन विषयक आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी विशेष भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी क्रमांक १ सुमित शिंदे, भूसंपादन अधिकारी क्रमांक ७ प्रमोद गायकवाड, भूसंपादन अधिकारी ११ श्रावण क्षीरसागर, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी विठ्ठल उदमले, सदाशिव पडदुने, विजया पांगारकर, प्रियंका आंबेकर, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक संजय कदम, केशव घोडके, सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह रेल्वे, वीज वितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, भूमी अभिलेख आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्गावर भूसंपादन विषयक ज्या अडचणी येत आहेत त्या संबंधित भूसंपादन अधिकारी तसेच राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी एकत्रित बसून त्यावर तात्काळ मार्ग काढावा. संबंधित शेतकरी अथवा अन्य लाभार्थी यांना विहित नियमावलीनुसार मिळणारा मोबदला तात्काळ द्यावा. महामार्गावर येणाऱ्या ज्या गावातील शेतकरी, नागरिक यांनी महामार्गाचे काम अडवले आहे, त्यांच्यासोबत संबंधित अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन त्यातून मार्ग काढावा. जे लाभार्थी महामार्गात गेलेल्या जमिनीचा ताबा देणार नाहीत अशा ठिकाणी विहित नियमावलीचा वापर करून पोलीस बंदोबस्तात ताबा घेऊन त्या ठिकाणची कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

सुरत-चेन्नई महामार्गासाठी ६७८ प्रकरणात एकूण ५३४ कोटीचा निधी भूसंपादनासाठी मंजूर झालेला आहे. त्या अनुषंगाने आज पर्यंत २९५ कोटीचे वाटप झालेले आहे. परंतु अक्कलकोट तालुक्यातील १७ गावांमधील शेतकरी, ग्रामस्थ भूसंपादनासाठी अर्ज करत नाहीत. त्याचप्रमाणे अक्कलकोटसह बार्शी, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर अशा चार तालुक्यातील १७८ प्रकरणे प्रलंबित आहेत. तरी सर्व संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांनी संबंधित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी विशेष कॅम्प लावावेत. जमीन मोजणीची कार्यवाही भूमी अभिलेख कार्यालयाने पूर्ण करावी त्यासाठी आवश्यक असलेले शुल्क कोणी भरावे याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.


कृष्णा -मराठवाडा प्रकल्पातील उस्मानाबाद जिल्ह्यातील ६०४ हेक्टर क्षेत्र भूसंपादन करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असून, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ उत्तर सोलापूर व करमाळा तालुक्यातील १२२ हेक्टर क्षेत्र भूसंपादनाबाबत कार्यवाही संबंधित विभागाने त्वरित पूर्ण करावी. तसेच यातील २८ हेक्टर क्षेत्र भूसंपादनाच्या अनुषंगाने खाजगी वाटाघाटी करून कार्यवाही पूर्ण करावी अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. त्याचप्रमाणे पालखी महामार्गावरील भूसंपादनाच्या बाबतीत सर्व अडचणी दूर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी ,उपविभागीय अधिकारी , संबंधित पोलीस निरीक्षक यांनी संयुक्त बैठक घेऊन कार्यवाही करावी. नगर- करमाळा- टेंभुर्णी महामार्गाचे सोलापूर जिल्ह्यातील ६० किलोमीटरच्या रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. त्या अनुषंगाने सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी संयुक्त मोजणी मोहीम राबवावी, असे त्यांनी सूचित केले.

सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी सोलापूर जिल्ह्यातील भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. तसेच सोलापूर शहरातील दोन उड्डाणपलासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सोलापूर महापालिकेच्या वतीने राबवली जात आहे. त्या अनुषंगाने ज्या अडचणी केंद्र शासनाच्या रेल्वे, डाक विभाग तसेच राज्य शासनाच्या पोलीस विभागाकडून भूसंपादनाच्या अडचणी येत आहेत त्या संबंधित विभागाशी समन्वय साधून त्वरित पूर्ण कराव्यात. या अनुषंगाने लवकरच स्वतंत्र बैठक आयोजित केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सुचित केले. यावेळी सर्व संबंधित यंत्रणा प्रमुखांकडून त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती बैठकीत सादर केली. या विकास प्रकल्पातील भूसंपादन विषयक अडचणीच्या अनुषंगाने भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख सर्व संबंधित यंत्रणाची समन्वय ठेवणार आहेत.

# स्टार प्रवाहच्या थोडं तुझं आणि थोड माझं मालिकेत झळकणार लोकप्रिय अभिनेता समीर परांजपे

## मालिकेत साकारणार तेजस प्रभू ही व्यक्तिरेखा

स्टार प्रवाहच्या गोठ मालिकेतून घराघरात पोहोचलेला लोकप्रिय अभिनेता समीर परांजपे लवकरच थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेत तो तेजस प्रभू उर्फ तेजा ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. तेजस प्रभू हा स्वातंत्र्य सूर्य या वर्तमानपत्राचे संपादक भास्कर प्रभू यांचा नातू. स्वातंत्र्यसेनानींचा वारसा लाभलेल्या आपल्या घराण्याचा तेजसला प्रचंड अभिमान आहे. प्रभूंचा पारंपरिक वाडा जपण्यासाठी तेजसची धडपड सुरु आहे. मात्र त्याच्या वहिनीला तेजसला हरवून प्रभू निवासाचा ताबा मिळवायचा आहे. प्रभू कुटुंबाची शान समजली जाणारी ही वास्तू तेजस वाचवू शकेल का? यात त्याला कुणाची साथ मिळणार? हे मालिकेतून उलगडेल. स्टार प्रवाहच्या या नव्या मालिकेत काम करण्यासाठी



समीर प्रचंड उत्सुक आहे. तेजस या व्यक्तिरेखविषयी सांगताना समीर म्हणाला, 'तेजस ही व्यक्तिरेखा खूपच वेगळी आहे. तो खोडकर आहे. त्याला कुणी डिवचलं तर तो आपलं म्हणणं खरं करण्यासाठी वाट्टेल ते करु शकतो. मालिकेचं नाव आणि गोष्ट खूपच भावली मला. कोणतंही नातं एकतर्फी असून चालत नाही. थोडं तुझं आणि थोडं माझं करतच नातं टिकवावं लागतं. त्यामुळे प्रत्येक वगोगटाला आपलीशी वाटेल अशी गोष्ट आणि पात्र या मालिकेची जमेची बाजू म्हणता येईल. शिवानी सुर्वेसोबत मी पहिल्यांदा काम करतोय. काम करताना खूप मजा येतेय. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका थोडं तुझं आणि थोडं माझं १७ जूनपासून रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.'

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# नंगपूरा-मुर्री निवासी शाळेतून निलेश बडोले प्रथम तर यश भोयर द्वितीय



**गोदिंया/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

शहराला लागून असणारी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील वर्ग दहावीचे माध्यमिक शालान्त परिक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये बारा विद्यार्थी प्राविण्य प्राप्त असून तेरा प्रथम श्रेणीत आले. यावेळी शाळेतून निलेश राजकुमार बडोले ८४.०० टक्के घेऊन प्रथम आला तर यश भोयर याने ८३.४० घेऊन द्वितीय आला, तृतीय प्रफुल्ल नंदेश्र्वर ८२.४० तर धम्मदिप राऊत ८२.४० यांनी मिळविला आहे. माध्यमिक शालान्त परिक्षा मार्च २०२४ परिक्षेत सर्व विद्यार्थी पास होऊन शाळेचा शंभर टक्के लागलेला आहे. याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी भ्रमणध्वनी वरुन अभिनंदन केले. शाळेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल जाहीर झाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, प्रदीप ढवळे, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, तुषार महाजन आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## मनुस्मृतीला नवीन अभ्यासक्रमाद्वारे

वतीने मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य तसेच मा.जिल्हाधिकारी पुणे यांना निवेदन देण्यात आले.

परिषदेने जो आराखडा तयार केला आहे, त्यात उपवास, व्रतवैकल्ये, आत्मा, पुण्य, यज्ञ, मोक्ष, कर्म, नक्षत्रे, पुण्य कर्म, पंचांग, ज्योतिष ही आणि अशा प्रकारची अशात्रीय कल्पना आणि त्यांचा भडीमार केला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये जपण्यासाठी या परिषदेने कार्य करावे ही अपेक्षा असताना, या परिषदेने संविधानाच्या मार्गदर्शक मूल्यांची चेष्टा, अवहेलना केली आहे. कहर म्हणजे जाती-वर्ण विषमतेचा मनू, त्याची मनुस्मृती अभ्यासक्रमात आणणे म्हणजे विद्यार्थ्यांना भेदभाव करण्यास शिकवणे हे परिषदेचे आद्य कर्तव्यच दिसते आहे. घाईघाईत आराखडा मंजूर न करता, त्यासाठी चार महिने वाढीव देऊन, त्यावर निकोप चर्चा घडवून आणायला हवी, त्यावर विचारमंथन व्हायला हवे आणि त्यानंतरच त्याला अंतिम स्वरूप द्यावे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी त्यांच्या निरागसतेशी परिषदेने खेळू नये असे संघटनेला वाटते. मनुस्मृतीचा आधार घेणाऱ्यांचा सम्यक निषेध करते. संविधान मूल्यांच्या आधारावर राज्याचा शैक्षणिक आराखडा तयार करावा, असे आवाहन सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने रोहित भोसले यांनी केले.

यावेळी सातारा जिल्हा निरीक्षक रोहित भोसले, पुणे जिल्हा निरीक्षक अक्षय गोटेगावकर, अ.नगर जिल्हा निरीक्षक राहूल जगताप, पुणे शहराध्यक्ष चैतन्य इंगळे, उपाध्यक्ष किरण भवार, संघर्षा संखद, कौशल जळकोटकर, हंसराज खुणे, सुजल कांबळे, यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी ओम तांबे, बुद्धाप्रिया जगताप, ऐश्र्वर्या परतवाघ, प्रज्ञा रोकडे, संदीप बागुल, ऋषांत गायकवाड, प्रणिती क्षीरसागर तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मतमोजणी हा निवडणुकीचा शेवटचा

निराळी यांनी चार जून रोगीच्या मतमोजणीच्या अनुषंगाने रामवाडी येथील शासकीय गोडाऊनमध्ये निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. तसेच मतमोजणीसाठी नियुक्त केलेल्या सर्व नोडल अधिकारी व अन्य अधिकारी कर्मचारी यांच्यावर सोपवण्यात आलेला जबाबदारीची माहिती सविस्तरपणे सांगून ती जबाबदारी सर्व संबंधितांनी यशस्वीपणे पार पाडण्याचे आवाहन केले. मतमोजणी कक्षात दोन्ही मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी व प्रत्येक मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेले प्रत्येकी दोन असे एकूण चार निवडणूक निरीक्षक यांनाच मोबाईल वापरण्याची परवानगी असणार आहे, अशीही माहिती त्यांनी दिली.

## येत्या ४८ तासांत आचारसंहिता..

घातला आहे. तर, याउलट देशातील काही भागांत उष्णतेचा पारा खूप वाढल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यात अनेक विकास प्रकल्प सुरू असून त्यांना गति मिळणं अत्यंत आवश्यक आहेत. त्यासाठी निधी हस्तांतरित करावा लागेल. आचारसंहितेमुळे सरकारला हे करता येत नाही. याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कामकाज ठप्प झालं आहे. सध्या सुरू असलेली कामं पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावी लागतील. साधारणपणे, पायाभूत सुविधांची बहुतांश कामं पावसाळ्यात बंदच राहतात.

देशात लोकसभा निवडणुका जाहीर होताच, निवडणूक आचारसंहिता लागू होते. तर, नव्या सरकारचा शपथविधी होईपर्यंत ती लागू राहते. या काळात विद्यमान सरकार कोणत्याही प्रकारची नवी घोषणा करू शकत नाही. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. निवडणूक निकालानंतर ८ ते १० दिवसांत नवं सरकार स्थापन होईल. आचारसंहितेमुळे सरकारचं कामकाज पूर्णपणे ठप्प झालं आहे. मुख्य सचिवांच्या पत्रानंतर आचारसंहितेच्या निर्बंधातून काहीसा दिलासा मिळू शकतो, असं मानलं जात आहे.

# प्रणाली शिंदे यांचे दहावी परिक्षेत यश

**वागदरी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिंदगाव तां.दुळजापूर येथील प्रणाली शेषराव शिंदे यांनी इ.१० वी बोर्ड परिक्षेत ८८ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. सिंदगाव येथील प्रणाली शेषराव शिंदे यांच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती बेताची वडील रोजगारासाठी गाव सोडून हडपसर पुणे या ठिकाणी रोजंदारीवर काम करतात.घरभाडे कुटुंबाचा उदरनिर्वाह मुलांच्या शिक्षणाचा खर्च याचा ताळमेळ घातल कुटुंबाचा गाडा हाकतात.असा परिस्थितीतत प्रणाली ही रयत शिक्षण संस्था संचलित साधना हायस्कूल हडपसर पुणे येथे शिक्षण घेत होती.मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० वी बोर्ड परिक्षेत त्यांनी ८८ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# पोर्शे कार अपघाताची सीबीआय चौकशी करा : नाना पटोले

मुंबई : पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणात गर्भश्रीमंत व्यक्तींना वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप झाल्याचे दिसत असल्याने राज्याच्या यंत्रणेवर विश्वास नाही, पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फतच झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. टिळक भवन येथे ते पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले की, त्या अल्पवयीन आरोपीसोबत एका आमदाराचा मुलगाही कारमध्ये होता, तो कोण हे समजले पाहिजे. पुण्यातील घटनेत राज्याच्या गृहमंत्र्यांनी वकिलीचा वापर आरोपींना वाचवण्यासाठी केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बोपगांव मध्ये कृषी विभामार्फत बीज उगवण क्षमता चाचणी व हुमनी अळी नियंत्रण करिता प्रात्यक्षिके राबवुन जनजागृती अभियान

**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बीज उगवण क्षमता चाचणी : चालु खरीप हंगाम २०२४-२५ च्या अनुषंगाने उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी शेतकरी स्तरावर स्वउत्पादित बियाण्याचा वापर वाढविण्यासाठी शेतक-यांनी स्वतःकडील राखून ठेवलेल्या बियाण्याचा पेरणीसाठी वापर करण्यापूर्वी खालील प्रमाणे काळजी घ्यावी. पेरणीपूर्वी बियाण्याच्या उगवणक्षमतेची तपासणी चाचणी करणे फार गरजेचे असते. त्यावरून चांगल्या उगवणक्षमतेची खात्री पटू शकते. पेरणी करतेवेळी बियाण्याचे प्रमाण किती ठेवावे याबद्दल अंदाजही येऊ शकतो. उगवणक्षमतेची तपासणी घरच्या घरी करता येते व ही पद्धत अतिशय सोपी आहे.

**अ) उगवणक्षमता घरच्या घरी कशी तपासावी याबाबतची माहिती:** राखीव साठ्यामधील बियाण्याची शेतकरी स्तरावर उगवणक्षमता चाचणी करीता शेतक-यांकडील राखीव साठ्यामधील बियाण्याची किमान तीन वेळा घरगुती पद्धतीने स्थानिक पातळीवर उगवण क्षमता चाचणी घेणे आवश्यक आहे. (बियाणे साठवणूक करतेवेळी, मार्च अखेर व पेरणीपूर्व) त्यामुळे मार्चमध्ये राखीव साठ्याची घरगुती पद्धतीने बियाण्याची उगवण चाचणी करावी.

**बियाणेची उगवणक्षमता घरच्या घरी तपासण्याची पध्दत:**

१) शेतक-यांनी स्वतःकडे असलेले बियाणेची चाळणी करून त्यामधील काडीकचरा, खडे, लहान फुटलेले बियाणे वेगळे करावे. चाळणीनंतर स्वच्छ झालेले एका आकाराचे बियाणे चाचणीसाठी निवडावे. वर्तमानपत्राचा एक कागद घेऊन त्याला चार घड्या पाडाव्यात यामुळे कागदाची जाडी वाढेल. नंतर ती पूर्ण कागद पाण्याने ओला करावा, प्रत्येकी १० बिया घेऊन त्या एका रांगेत समान अंतर सोडून वर्तमानपत्राच्या टोकाच्या भागावर ठेवून त्याची गुंडाळी करावी, अशारितीने १०० बियांच्या गुंडाळ्या तयार कराव्यात. नंतर या गुंडाळ्या पॉलिथीन पिशवीत चार दिवस तशाच ठेवाव्यात चार दिवसानंतर त्या हळूहळू उघडून पाहुन त्यामध्ये बीजांकृत इसलेल्या बिया मोजाव्यात. जर ती संख्या ५० असेल तर उगवणक्षमता ५० %



आहे असे समजले जाते. जर ती संख्या ८० असेल तर उगवणक्षमता ८० % आहे असे समजावे, अशा पध्दतीने उगवणक्षमतेचा अंदाज घेता येतो. बियाण्याची उगवणक्षमता चांगली म्हणजेच ७० ते ७५% असेल तर शिफारस केलेल्या मात्रेनुसार प्रति हेक्टर ७५ किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.२) शेतक-यांनी स्वतःकडील बियाणे वापरण्यापुर्वी त्याची उगवणक्षमता उपरोक्त पध्दतीने तपासून नंतरच अशा बियाण्याची पेरणी करावी, सोयाबीन ,भुईमूग सारख्या बियाणांची उगवणक्षमता ७० टक्केपेक्षा कमी असल्यास त्या प्रमाणात अधिकचे बियाणे पेरणीसाठी वापरावे.

**हुमनी अळी नियंत्रण :** वळीव पावसाच्या हजेरीने मशागतीच्या कामांना वेळेत सुरुवात झाली आहे तर दुसरीकडे हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. गेल्या सात- आठ वर्षांत हुमणीच्या प्रादुर्भावामुळे ऊस, भुईमूग, सोयाबीन तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे ३० ते ४० टक्के उत्पादन घटले. प्राथमिक अवस्थेत बंदोबस्त व्हावा, यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने मौजे बोपगाव येथे हुमनी नियंत्रण प्रकाश सापळा प्रात्यक्षिके घेण्यात आले.

वळीव पाऊस झाला की, जमिनीतील भुंगे सूर्यास्तानंतर बाहेर पडतात. ते बाभूळ, कडुनिंब किंवा बोर झाडावर पाने खाण्यासाठी बसतात. या भुंग्यापासूनच पुढे जमिनीत हुमणीची अळी तयार होते. भुंगे हे गडद तपकिरी रंगाचे असतात. तर अळी ही गडद तपकिरी तोंड असलेली पांढऱ्या रंगाची इंग्रजी 'सी' आकाराची असते. याचा प्रादुर्भाव हळूहळू दिसून येतो. अंडी मोठ्या प्रमाणात जमिनीत घालतात. त्यामुळे हुमणीचा प्रादुर्भाव झपाट्याने विस्तारतो. मुळातच मे-जून महिन्यातच निर्मितीच्या अगोदर प्राथमिक टप्प्यात हुमणीचा बंदोबस्त करणे शक्य होते. या कारणास्तव कृषी विभागाने त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले आहे. खरीप हंगामाच्या तयारीबरोबरच त्याच्या नियंत्रणासाठी प्रबोधन, प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना दाखविली जात आहेत. हुमनी नियंत्रण करिता जास्तीत जास्त प्रकाश सापळे लावावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी पुरंदर यांचे वतीने करण्यात येत आहे.

सापळा लावण्यासाठी जास्तीत जास्त पाच बाय चार आकाराचा १ फूट खोल खड्डा काढावा. पिवळा प्लास्टिकचा कागद लावून त्यावर १०० वॅट बल्ब लावावा. सायंकाळी सहा त आठ या वेळेत सापळा लावला जावा, या प्रकाशाकडे भुंगे आकर्षित होतात. ती नष्ट करता येतात.

त्यामुळे हुमणी अळीचा बंदोबस्त तसेच नियंत्रण करता येते. पुरंदर तालुका शिवारात ऊस व इतर पिकाचे क्षेत्र जास्त आहे. मागील काही वर्षांत हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे उभ्या शेती पिकाचे नुकसान झाले आहे परिणामी उत्पादन घटल्यामुळे शेती तोट्यात आली.विशेष म्हणजे अळीचा प्रादुर्भाव झपाट्याने होतो. नियत्रंण करणे अवघड होऊन बसते. त्यामुळे प्राथमिक टप्प्यात नियत्रंण होणे गरजेचे असते. सदर , हुमनी नियंत्रण प्रकाश सापळा प्रात्यक्षिक बाबत मार्गदर्शन श्री.विजय जाधव कृषी सहाय्यक, बोपगाव यांनी दिले तदप्रसंगी बोपगावतील कृषी मित्र ,शेतकरी उपस्थित होते.बियाणे उगवण क्षमता चाचणी:

## आ. समाधान आवताडे यांनी मतदारसंघातील विविध गावांना भेटी देऊन नुकसानग्रस्तांची पाहणी केली



**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर तालुक्यातील तावशी एक्सप्रेस मंगळवेढा तालुक्यातील निंबोणी खुपसंगी मारापुर अकोला राजापूर पाटकर या भागात झालेल्या वाद अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांना सोबत घेऊन तालुक्यातील अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याच्या मुळे शेतीचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच घरावरील शाळेवरील पत्रे वाऱ्यामुळे उडून गेले आहेत

आज प्रत्यक्ष भेट देऊन येतील नुकसानाची पाहणी केली त्यावेळी नुकसान करताना शेतकरी बांधवांची संवाद साधला त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि नुकसान नीचा आढावा घेतला

या वादळामुळे अवकाळी पावसामुळे अनेक भागात फळबागाची प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे त्याचबरोबर वादळामुळे संपूर्ण केळी भागाचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे एकही खोड जिवंत राहिलेले नाही केळीचे हे शंभर टक्के पाणी दरम्यान ुसार रतन शेतकऱ्यांना आमदार समाधान तर यांनी भेट देत प्रशासनाच्या तात्काळ पंचनामे करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत दे करण्याच्या सूचना दिल्या या नागरिकांना शासनामार्फत शक्य तेवढी मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील असल्याचा आत्मविश्र्वास आमदार समाधान आवताडे. यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर यांच्यासह इतर मंडळी संबंधित गावातील ग्रामस्थ ग्रामपंचायत पदाधिकारी सदस्य व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित

## कल्याणशेट्टी विद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**अक्कलकोट/प्रतिनिधी :** सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी,सेमी व कन्नड माध्यम विद्यालयाचा मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेस एकूण ७८ विद्यार्थी बसले होते.

पैकी ७७ उत्तीर्ण होऊन ९८.७१% निकाल लागला आहे. यात ९०% पेक्षा जास्त ६ विद्यार्थी असून ७५ % पेक्षा जास्त ३७ विद्यार्थी आहेत. कु. प्रतिक्षा सोलनकर ही ९२.८०% गुण मिळवून प्रशालेत प्रथम आली आहे. कु.स्फूर्ती खराडे ही ९२.६०% गुण मिळवून द्वितीय आली, तर कु.लक्ष्मी चिकमळी ही ९१.६०% गुण मिळवून प्रशालेत तिसरी आली आहे. यावर्षीही गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पेढा भरवून सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, अशोक येणगुरे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपस्थित होते. सूत्रसंचलन जेष्ठ शिक्षक खंडेराव घाटगे यानी केले..

## निफाड येथे शेततळ्यात पडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू

**निफाड/प्रतिनिधी**

निफाड येथील रहिवासी गोपाळ जयराम ढेपले हे नांदुर्डी रस्त्यालगत राहत असून त्यांची दोन्ही मुले प्रेम गोपाळ ढेपले अंदाजे वय १५ वर्षे व त्यांचा लहान भाऊ प्रतीक गोपाळ ढेपले अंदाजे वय १३ वर्षे या दोघांचा घराजवळच असणाऱ्या शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे,





सविस्तर वृत्त असे की दिनांक २९ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या दरम्यान गोपाळ जयराम ढेपले यांची दोन्ही मुले प्रेम व प्रतीक हे घरच्या विहिरीवरील मोटर चालू करण्यासाठी गेली होती. लहान भाऊ प्रतीक हा अंगावरची कपडे काढून तळ्यात पोहण्यासाठी गेला असावा मात्र त्याला पोहता येत नसल्यामुळे तो बुडायला लागला, त्याला बुडतांना पाहून त्याला वाचवण्यासाठी मोठा भाऊ प्रेम याने अंगावरील कपड्यासह पाण्यात उडी घेतली मात्र याला ही पोहता येत नसल्यामुळे या दोघा सख्ख्या भावांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला,, शेतात गेलेली दोन्ही मुले घरी लवकर परत न आल्याने त्यांचा शोध घेण्यासाठी गेलेल्या कुटुंबीयांनी जवळपास शोधून बघितले तर शेततळ्याजवळ एका मुलाचे त्यांना कपडे आढळून आले, मुले पाण्यात बुडाली असावी अशी शंका येताच सर्वांनी धावपळ करून शेततळ्यात बुडालेल्या दोन्ही मुलांना बाहेर काढले,. त्यांना तात्काळ निफाड उपजिल्हा रुग्णालयात आणले असता ते मृत असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले रुग्णालयातील उत्तरीय तपासणी डॉ. तांभाळे यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.गावले यांनी केली असून या दुर्दैवी घटनेचे वृत्त समजतात आ. दिलीप बनकर, निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे , जिल्हा शल्य चिकित्सक चारुदत्त शिंदे,शिवाजीराजे ढेपले, नगराध्यक्ष सागर कुंदे, किशोर ढेपले, आदींनी धाव घेऊन घटनास्थळास भेट देऊन पाहणी केली व दुःख व्यक्त केले या घटनेने संपूर्ण निफाड शहरावरती शोककळा पसरली असून या घटनेचा पुढील तपास निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांचे मार्गदर्शनाखाली पीएसआय ईश्र्वर पाटील, आनंद पठारे ,तसेच पोलीस नितीन सांगळे विक्रम लहाने, राजु मनोहर,कावळे, मनिषा ठोक,सोनाली शिंदे,पुनम शिंदे,भारत पवार ,आदी करत आहेत

ढेपले परिवारातील या दोन अल्पवयीन सख्ख्या भावांचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला हे अत्यंत दुःखद घटना असून ज्यांचे शेततळे आहे अशा प्रत्येक शेतकरी बांधवांनी आपल्या शेततळ्यात चारीही बाजूने मोठाली गाठ देऊन जर शेततळ्यात दोरखंड सोडले व वरील बाजूस दोर लावले तर शेततळ्यात बुडणाऱ्या व्यक्तींना या दोरखंडाचा आधार घेऊन आपला जीव वाचवता येईल यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा व पुढील होणाऱ्या घटना टाळता येऊ शकतात

**शिवाजीराजे ढेपले, सामाजिक कार्यकर्ते.**

## उल्हासनगर ३१६ धोकादायक इमारतींविरुध्द निष्कासनाची कारवाई

**उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे**

उल्हासनगर महानगरपालिका धोकादायक इमारतीची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शहरात एकुण ३१६ धोकादायक इमारती घोषित करण्यात आल्या असून सर्व इमारतीमधील रहिवाश्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांचेमार्फत नोटीस बजावणी करण्यात आलेली आहे.शहरातील काही इमारती हया अतिधोकादायक असल्याचे दिसून आल्याने महापालिकेमार्फत आज दिनांक २८.०५.२०२४ पासून सदर इमारती निष्कासीत करण्यासाठी सुरुवात करण्यात आलेलो आहे. मा. प्रशासक तथा आयुक्त, डॉ. अझीझ शेख यांचे आदेशान्वये सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४. उल्हासनगर महानगरपालिका, यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील खालील धोकादायक इमारती निष्कासीत करण्यास सुरुवात केलेली आहे.

१. मिनर्वा पॅलेस अपार्टमेंट, हिललाईन पोलीस स्टेशन जवळ, उल्हासनगर-४२१००५. २. रुपानी महल अपार्टमेंट, प्रभाराम मंदिरासमोर, उल्हासनगर-४२१००५.३. गंगासागर अपार्टमेंट, सेवक बेकरीसमोर, उल्हासनगर-४२२००५, ४. पवनधाम अपार्टमेंट, कैलास कॉलनी, स्मशानभूमीसमोर, उल्हासनगर-४२१००५, सदर इमारती सुमारे १ वर्षापूर्वी रिकाम्या करण्यात आल्या होत्या, येणारा पावसाळा लक्षात घेता इमारत कोसळून लगतच्या नागरिकाना धोका होऊ नये यासाठी सदर इमारती निष्कासीत करण्यात सुरुवात करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील इतर भागात देखिल टप्प्या टप्प्याने धोकादायक इमारती निष्कासीत करण्यात येणार आहेत.




## आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार ज. वि. पवार यांच्या कर्तृत्वावर जागतिक मोहर !

### उत्तर अमेरिकेतील आंबेडकराईट असोसिएशनचा' विशेष पुरस्कार प्रदान !

**चिपळूण/विशेष प्रतिनीधी:** दलित पँथरचे सहसंस्थापक आणि आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, जेष्ठ साहित्यिक ज. वि. पवार यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कर्तृत्वावर दिनांक २५ मे २०२४ रोजी जागतिक मोहर उमटविण्यात आली आहे. नॉर्थ अमेरिकेतील आंबेडकराईट असोसिएशन या संस्थेचा २०२४ सालचा विशेष पुरस्कार भारतातील सुप्रसिद्ध लेखक ज. वि. पवार यांना त्यांच्या अनुपस्थितीत देण्यात आला . आंबेडकराईट असोसिएशन ऑफ नोर्थ अमेरिका ही संस्था दरवर्षी सामाजिक क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या एका व्यक्तीस डॉ. आंबेडकर पुरस्कार देऊन सन्मानित करीत असते. यावर्षी ज. वि. पवार यांनी उद्दीपित केलेल्या चळवळीचा, त्यांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदेचा तसेच समाज उन्नयनासाठी दिलेल्या जगभरातील व्याख्यानांच्या सन्मानार्थ हा पुरस्कार देण्यात आला आहे . हा पुरस्कार म्हणजे पवार यांनी प्रगल्भित केलेल्या आंबेडकरवादाचा सन्मान आहे. ज.वी. पवार यांनी आंबेडकरवादाची कधीही कास सोडली नाही. उभे आयुष्य त्यांनी केवळ आंबेडकरवादाची जपणूक केली आहे .ज . वी. पवार यांची ग्रंथसंपदा मराठी, हिंदी, इंग्रजी व भारतातील अनेक प्रादेशिक भाषेत प्रसिद्ध झाली असून अनेक विद्यापीठातील अभ्यासक त्यांच्या चळवळीवर व साहित्यावर प्रबंध लिहीत आहेत. त्यांच्या कवितांचा आणि ग्रंथांचा समावेश अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेला आहे. आजही ते सतत क्रियाशील असून आंबेडकरवादी चळवळीत अत्यंत सक्रिय आहेत. त्यांच्याच आशीर्वादाने अपरांत साहित्य कला प्रबोधिनी या साहित्य विषयक संस्थेचा उदय झालेला आहे. त्यांना मिळालेल्या या जागतिक पुरस्काराबद्दल आंबेडकरी चळवळीतून तसेच समाजाच्या सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# वादळातील नुकसानीची सरसकट भरपाई मिळावी

■ वीज पडून मयत आणि जखमींना मदत मिळावी यासाठीही केली मागणी ■

## ना.फडणवीस यांच्याकडे अभिजीत पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी

**पंढरपूर/प्रतिनिधी:** सोलापूर जिल्ह्यासह पंढरपूर, मंगळवेढा, माढा व मोहोळ तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे त्वरीत पंचनामे होऊन ,नुकसानग्रस्तांना सरसकट भरपाई मिळावी अशी मागणी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.



पंढरपूर, मंगळवेढा, माढा व मोहोळ हे तालुके पूर्वीपासूनच दुष्काळजन्य परिस्थितीला तोंड देत आलेले आहेत. या परिस्थितीतून तोंड देत कशीबशी पिके जतन केली होती. परंतू अशातच या तालुक्यांतील गावांना काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा व वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसलेला आहे. या अवकाळी पावसामुळे हाता-तोंडाला आलेल्या पिकांसह केळी, डाळींब, द्राक्षे व आंबा आदी फळबागांसह शेतकऱ्यांच्या राहत्या घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तालुक्यातील जवळपास प्राथमिक अंदाजे १००० ते १५०० हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे. त्यापैकी ५० टक्के क्षेत्र हे केळी फळबागांचे आहे. दुष्काळामुळे अगोदरच शेतकरी आपली पिके जगवण्यासाठी संघर्ष करीत असतांना अचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे पिकांसह राहत्या घरांची छते, पत्रे उडून मोठे नुकसान झालेले आहे. यामधून बळीराजाचे संसार उघड्यावर आला असल्यामुळे त्यांना दिलासा देणेसाठी आर्थिक मदतीची अत्यंत गरज आहे.पंढरपूर तालुक्यातील करकंब, नांदोरे, पेहे, नेमतवाडी, शेवते, गोपाळपूर, मुंढेवाडी, अनवली व इतर अनेक गावांमध्ये उभी पिके जमीनदोस्त होवून तालुक्यातील १९ गावांमधील वीजेचे खांबांसह महापारेषणचे मोठे टॉवरही पडलेले आहेत. या भागातील शेतकऱ्यांना त्वरीत वीजेची सोय होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ, भाळवणी, निंबोणी, खुपसंगी, मारापूर, अकोला, लक्ष्मी दहिवडी, मेटकरवाडी, आंधळगांव, हाजापूर, जालिहाळ, भोसे, हुन्नूर, मानेवाडी, गुंजेगांव व इतर अनेक गावांमध्ये पिकांचे फार मोठे नुकसान झालेले असून मारापूर, गुंजेगांव, खुपसंगी, लक्ष्मी दहिवडी, कचरेवाडी, जालिहाळ या गावांमधील महापारेषणचे मोठे टॉवर जमीनदोस्त झाल्यामुळे त्या गावांमधीलही वीज पुरवठा खंडीत झालेला आहे.मोहोळ तालुक्यातील खंडाळी, पापरी, आष्टी, येवती आणि माढा तालुक्यामध्ये परीते, मोडनिंब, टेंभुर्णी, माढा व तालुक्यांतील इतर अनेक गावांमध्ये पिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यासह पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरीकांच्या व शेतकऱ्यांच्या पिकांचे व घरांचे वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे ठराविक पंचनामे न करता सरसकट नुकसानींचे पंचनामे करून, त्वरीत नुकसानग्रस्तांना भरपाई मिळणेकामी संबंधितांना आपलेकडून आदेश देण्यात यावेत.अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना निवेदनाद्वारे केली आहे. सदरचे निवेदन ना.फडणवीस त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेटून दिले आहे. यावरती उपमुख्यमंत्री महोदयांनी त्वरित याप्रश्नी तोडगा काढण्यासाठी राज्य सरकार पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करत असल्याचे सांगितले. राज्य सरकार झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई देण्यासाठी पूर्णपणे सकारात्मक असल्याचेही ना.फडणवीस यांनी चेअरमन अभिजीत पाटील यांना बोलताना सांगितले आहे.

### वीज पडून मयत आणि जखमींना मदत मिळावी यासाठीही केली मागणी

मागील चार दिवसांपूर्वी अवकळी पावसामध्ये वीज पडून, घटलेल्या दुर्घटनेमधील जखमी व मयत झालेल्या महिल्यांच्या कुंटूबियाना आर्थिक मदत मिळण्याकरिता चेअरमन अभिजीत पाटील यांनी स्वातंत्र्य पत्र देऊन उपमुख्यमंत्री ना फडणवीस यांच्याकडे मागणी आहे.

सोलापूर जिल्ह्यासह पंढरपूर तालुक्यामध्ये वादळी वाऱ्यासह वीजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला रविवार दि.२६ मे, २०२४ रोजी दुपारी ०४.०० च्या सुमारास त्यामध्ये मौजे भटुंबरे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील रहिवासी शारदा कल्याण कुंभार यांचा वीज पडून जागीच मृत्यु झाला. बाळाबाई रतन वाघमारे आणि लक्ष्मी नामदेव आडगळे या २ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. अत्यंत वाईट दुर्घटना घडली तरी सदर मयत व गंभीर जखमी झालेल्या महिला शेतातील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. या कुटुंबाला आपल्या वतीने आधार देऊन शासनाकडून आर्थिक मदत होणेकामी संबंधितांना आपले त्वरीत आदेश व्हावेत, अशी विनंतीही केलीआहे. त्यामुळे याना लवकरच मदत मिळेल अशी शक्यता निर्माण झाली आहे.

# मिसाळवाडी शेतशिवारात नोझल चोरट्यांचा धुमाकूळ; सहा शेतकऱ्याचे ७० नोझलची चोरी

✻ उन्हाळी पिकांना पाणी कसे द्यायचे? शेतकऱ्यांचा तीव्र संताप!
✻ अंढेरा पोलिसांत गुन्हा दाखल; लवकरच चोरट्यांना हुडकून काढू

**बुलढाणा/राहुल साबळे**

चिखली तालुक्यातील मिसाळवाडी शिवारात शेतकर्यांच्या स्प्रिंकलर नोझलच्या चोर्या करणार्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, मिसाळवाडी येथील शेतकर्यांचे नोझल चोरीला गेले आहेत. विशेष म्हणजे, मिसाळवाडीचे उपसरपंच हनुमान मिसाळ यांचेही २२ नोझल चोरट्यांनी लंपास केलेले आहेत. यामुळे उन्हाळी पिकांना पाणी कसे



द्यावे, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे. याबाबत अंढेरा पोलिसांत मिसाळवाडी चे उपसरपंच यांनी तक्रार दाखल करण्यात आली असून, नोझल चोरट्यांना पाताळातूनही हुडकून आणून, त्यांचा बंदोबस्त करू, असा इशारा ठाणेदार विकास पाटील यांनी दिला आहे. दरम्यान, अंत्रीखेडेकर येथील नौझेल चोरी बेंड स्टार्टर भरोसा शेतशिवारातही अशीच घटना घडली असून, तेथे देखील शेतकर्यांचे नोझल चोरीस गेले आहेत. याचा सुद्धा तपास आजुन लागले नाही तोच मिसळवाडी येथे चोरांनी चांगलाच हात साप केला आहे

मिसाळवाडी येथील शेतकरी सतिश विष्णू भगत हे आपल्या शेतात फेरफटका मारण्याकरिता गेले असता, त्यांना शेतातील स्प्रिंकलरचे नोझल दिसून न आल्याने त्यांनी बाजूच्या शेतकर्यांना माहिती दिली. त्यावेळी त्या शेतकर्यांनी त्यांच्या शेतातील नोझलसुद्धा चोरी गेल्याचे भगत यांना सांगितले. शेतीसाहित्य चोरीच्या या वाढत्या घटनांमुळे शेतकरी तीव्र संताप व्यक्त करत आहेत. मिसाळवाडी येथील सतिष विष्णू भगत यांचे १२ नोझल, राजू रूस्तुमा मिसाळ यांचे १२ नोझल, नितीन नारायण मिसाळ यांचे १३ नोझल, अण्णा तेजराव मिसाळ यांचे १३ नोझल, भारत अंबादास भगत यांचे १० नोझल, उपसरपंच हनुमान मधुकर मिसाळ यांचे २२ नोझल चोरट्यांनी लंपास केलेले आहेत. मिसाळवाडीचे सरपंच बाळू पाटील, उपसरपंच हनुमान मिसाळ यांनी घटनास्थळी जात, शेतकर्यांना दिलासा दिला, तसेच पोलिसांशी संपर्क साधून नोझल चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली.

याबाबत शेतकरी नितीन मिसाळ, उपसरपंच हनुमान मधुकर मिसाळ यांनी अंढेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे. नोझल चोरीमुळे शेतकर्यांचे सुमारे एक लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. मिसाळवाडी शिवारातून वारंवार शेतीसाहित्य चोरीला जात असेल, तर शेती करायची कशी? असा प्रश्न या अनुषंगाने शेतकर्यांनी उपस्थित केला आहे.

तर अंढेरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार विकास पाटील यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, नोझल चोरांचा लवकरच छडा लावू, असा इशारा दिला आहे.

# निफाड ते कोठुरे सायकल राईड द्वारे स्वा.वि.दा.सावरकर यांना अभिवादन



**निफाड/प्रतिनिधी**

निफाड सायकलीस्ट निफाड द्वारे निफाड ते कोठुरे सायकल राईड द्वारे स्वा वि दा सावरकर जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. निफाड ते बानेश्र्वर मंदिर येथे दिलीप बर्वे यांनी या प्रसंगी कोठुरे गावचा इतिहास व सावरकरांच्या आठवणी सांगितल्या.

असून त्यानंतर सर्व सायकलीस्ट व ग्रामस्थ यांनी सावरकरांचे वास्तव्य असलेल्या दोन्ही वस्तूंना भेट देऊन भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. याप्रसंगी माधवराव गीते, मोतीराम मोगल, दिलीप बर्वे, सुयोग गीते, चंद्रभान मोगल, सुनील मुळे, मनोज डोंगरे ,मधुकर पवळे, माधवराव मोगल , बाळासाहेब मोगल , उत्तम पगार , माधवराव उगले , नितीन कोरडे , जनार्दन मोगल , प्रकाश मोगल, सतीश मोरे, शरद पवार, प्रताप मोगल आदी ग्रामस्थ उपस्थित होते. निफाड सायकलीस्ट चे प्रविण काहाने, दिपक घंगाळे, ओंकार घंगाळे, प्रियंका मोरे यांना जर्सी (टी शर्ट) वाटप करण्यात आले. श्रीगोंदा सायकलीस्ट आयोजित जयंती उत्सव चॅलेंज राईड (म फुले, श्रीराम, डॉ आंबेडकर, महावीर, हनुमान जयंती पाचही दिवस २४ किमी सायकलिंग) सहभागी सायकलीस्ट पांडुरंग कडवे, अशोक कोल्हे व प्रविण तनपुरे यांना मेडल मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन सुयोग गीते यांनी तर सूत्रसंचालन प्रविण तनपुरे यांनी आणि आभार डॉ सौ सीमा डेर्ले यांनी मानले.

# स्वेरीतील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. त्यानिमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. स्वेरीमध्ये चार वर्षे परिश्रम केल्यामुळे आणि गुरु-शिष्याचे एक वेगळे बंधन जपल्यामुळे कॉलेज सोडताना विद्यार्थी भावनिक झाले होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली हा समारंभ संपन्न झाला. दीप प्रज्वलनानंतर विभागप्रमुख डॉ.पवार यांनी विद्यार्थ्यांना करिअरसाठी व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच त्यांना आपल्या पुढील जबाबदारीची जाणीव करून यशाचे कानमंत्रही दिले. त्यानंतर काही करमणूक प्रदान कार्यक्रम करण्यात आले. स्वेरीमध्ये पदवीचे चार




वर्ष शिक्षण घेतल्यानंतर समारोप प्रसंगी विद्यार्थी भावनिक झाले होते.

या समारंभाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी चार वर्षातील आपले अनुभव सादर केले. यामध्ये ऋतुराज तारापूरकर, रोहित मिसाळ, सुयश गायकवाड, शिवराज मगर, वृषाली जानगवळी यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी चार वर्षांच्या काळात संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक वर्गांनी आमच्याकडून अभ्यास कसा करवून घेतला? परिश्रमाद्वारे अभ्यासात सातत्य ठेवण्याबाबत तसेच प्राध्यापकांनी आम्हाला चुकीच्या वेळी दिलेली शिक्षा, त्यातून मिळालेले अनमोल शिक्षण यातून आमच्या करिअरसाठी तयार झालेली परिपक्व आणि संस्कारित प्रतिमा या विषयी विद्यार्थ्यांनी अतिशय हृदयस्पर्शी असे अनुभव सांगितले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग मधील सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. प्रा.एम.ए.सोनटक्के यांनी समन्वयकांची भूमिका बजावली. प्रा.एस. वाय. अभंगराव व प्रा.एम.ए. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.एन. पी. कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

# ईटकूर प्रशालेत १० वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**ईटकूर/सुधाकर रणदिवे:**

कळंब तालुक्यातील ईटकूर येथील जिल्हा परिषद प्रशालेचा इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.तसेच या परिक्षेत मुलीनी बाजी मारली आसुन,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष हरिदास पावले, सचिन गंभीर तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मोहरबाई कस्पटे,आदर्श शिक्षक तुकाराम शिंदे व पोपट आडसुळ यांची उपस्थिती होती. यावेळी दहावी बोर्ड परीक्षेत

प्रथम अडसूळ वैष्णवी पोपट - ९५.२०, द्वितीय अडसूळ अंजली



मधुकर-९३.२० द्वितीय. अडसूळ ज्ञानेश्र्वरी बाबासाहेब - ९३.२० तृतीय कस्पटे वैभव संतोष ९२.६० गुण घेत यश संपादन केल्याबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक तुकाराम गरुडे , पत्रकार बालाजी देसाई, विनोद चव्हाण,महादेव आडसुळ, मधूकर आडसुळ, बाबासाहेब आडसुळ, शिक्षक मोहम्मद सय्यद, चंद्रकांत शिंदे, कोठावळे सर, रत्नपारखी व गावातील मंडळी, पालक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

# अनंत चैतन्य प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे मार्च २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या कु. सानिका मंगरुळे (८८% प्रथम) ,कु.मुनजा पिरजादे(८७.२०% द्वित्तीय) कु.शिरीन पिरजादे(८७% तृत्तीय) अशा तीन ही विध्यार्थीनींचा सत्कार हन्नूर गावचे उपसरपंच व युवा नेते सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन व पेढा भरवून करण्यात आला. कु. सानिका मंगरुळे ही ८८% गुण प्राप्त करून चप्पळगाव केंद्रातून पहिली आल्याबद्दल सागरदादा यांनी तिचे विशेष कौतुक करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.व सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.आणि विशेष बाब म्हणजे दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी शाळेचा निकाल १००% लागला. यावेळी मुख्याध्यापक विलास बिराजदार, पर्यवेक्षक अशोक साखरे,शिक्षक ज्ञानदेव शिंदे,श्री. धनंजय जोजन, शशिकांत अंकलगे, सौ. मृदुलादेवी स्वामी,राजेंद्र यंदे, पालक इरण्णा मंगरुळे, खमरअली पिरजादे उपस्थित होते.

